# शेतकरी संघटना आंदोलने आणि शरद जोशी
# (Farmers Association Movements and Sharad Joshi)

डॉ. पवन मांडवकर
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ, महाराष्ट्र, (India) ४४५४०१
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
E mail: pavanmandavkar@hotmail.com भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८

## गोषवारा:

शेतकरी संघटनांच्या चळवळींमध्ये शरद जोशी यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. शेतकऱ्यांसाठी अनेक आंदोलने त्यांनी केली. ग्रामीण भागातील जनतेनेही या नेत्याला भरभरून पाठिंबा दिला. 1977 पर्यंत ते स्वित्झर्लंड येथे नोकरीस होते. तेथे काम करीत असताना त्यांनी जगातील आणि भारतीय शेतकऱ्यांच्या स्थितीबाबत अभ्यास केला. भारतीय शेतकऱ्यांची दयनीय अवस्था पाहून ते अस्वस्थ झाले. त्यातून त्यांनी युनोतील नोकरीचा राजीनामा दिला व शेतकऱ्यांसाठी काम करण्यासाठी ते भारतात परत आले. भारतात आल्यावर व्यक्तीस्वातंत्र्य आणि समाजाच्या कारभारातील सरकारी हस्तक्षेप कमीत कमी करणे या प्रमुख उद्देशाने त्यांनी काम सुरू केले. भारताच्या विकास प्रक्रियेमध्ये शेतकरी आणि शेतमजुरांना स्थान मिळावे, कृषी मालाला योग्य हमी भाव मिळावा, पोशिंद्या शेतकऱ्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळावे यासाठी ते आयुष्यभर लढले. त्यांनीच शेतकऱ्यांना लढायचे बळ दिले शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आणि लढवय्ये नेते म्हणून शरद जोशी ओळखले जातात.

## Abstract:

Sharad Joshi's name is given priority in the movements of farmers' organizations. He did many agitations for the farmers. The people in the rural areas also gave their full support to this leader. Until 1977 he was employed in Switzerland. While working there, he studied the situation of the world and Indian farmers. He was upset to see the plight of Indian farmers. He resigned from his job at UNO and returned to India to work for farmers. Upon his arrival in India, he set out with the main objective of minimizing government interference in individual liberty and social affairs. He fought all his life for the place of farmers and agricultural laborers in the development process of India, for a fair price for agricultural commodities, and for the economic freedom of subsistence farmers. He is the one who gave strength to the farmers to fight. Sharad Joshi is known as the founding president of the farmers' association and a fighter leader in India.

## प्रस्तावना :

'शेतकरी संघटना : चळवळी व आंदोलने' या विषयाचे अध्ययन करताना एक नाव प्रकर्षाने पुढे येते आणि ते म्हणजे 'शरद जोशी'. शरद जोशी यांचे नाव माहिती नाही, असा महाभाग महाराष्ट्रात तरी सापडणार नाही. या व्यक्तीला ज्याने ऐकले, ज्याने पाहिले किंवा ज्याने वाचले तो या माणसाच्या प्रेमात पडल्यावाचून राहणार नाही. शेतकऱ्यांसाठी अभूतपूर्व आंदोलने ज्याने केली आणि ग्रामीण भागातील जनतेने आपल्या या दैवतासमान नेत्याला भरभरून पाठिंबा द्यावा, इतका की शासनालाही भीती वाटावी, असा हा नेता होता.

शरद जोशी यांचे प्राथमिक शिक्षण बेळगाव येथे, माध्यमिक शिक्षण मुंबई येथे झाले. बँकींग परीक्षेसाठी सी. रँडींग सुवर्णपदक त्यांनी पटकावले. कोल्हापूर येथील कॉमर्स कॉलेजमध्ये त्यांनी अर्थशास्त्र व संख्याशास्त्र विषयाचे व्याख्याते म्हणून काम केले. 1958 मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन ते भारतीय टपाल सेवेत रुजू झाले. 1958 ते 1968 या काळात टपाल खात्यात काम करीत असताना त्यांचा पिनकोड यंत्रणेच्या पायाभरणीचे प्रवर्तक म्हणून सहभाग होता. वेगवेगळ्या पदांवर काम करत असताना त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघापर्यंत झेप घेतली होती. अर्थशास्त्र आणि संख्याशास्त्राचे

अधिव्याख्याता असल्यामुळे त्यांची शेतीच्या अर्थव्यवस्थेवर मजबूत पकड होती. 1977 पर्यंत ते स्वित्झर्लंड येथे नोकरीस होते. तेथे काम करीत असताना त्यांनी जगातील आणि भारतीय शेतकऱ्यांच्या स्थितीबाबत अभ्यास केला. भारतीय शेतकऱ्यांची दयनीय अवस्था पाहून ते अस्वस्थ झाले. त्यातून त्यांनी युनोतील नोकरीचा राजीनामा दिला व शेतकऱ्यांसाठी काम करण्यासाठी ते भारतात परत आले. भारतात आल्यावर व्यक्तीस्वातंत्र्य आणि समाजाच्या कारभारातील सरकारी हस्तक्षेप कमीत कमी करणे या प्रमुख उद्देशाने त्यांनी काम सुरू केले. शेती प्रश्नांबाबत वृत्तपत्रांतून लेखनाला प्रारंभ केला. 9 ऑगस्ट 1979 रोजी चाकण येथे शेतकरी संघटनेची स्थापना केली. जुलै 2004 ते 2010 दरम्यान ते राज्यसभेचे खासदार होते. खासदार म्हणून त्यांनी देशभरातील शेतकऱ्यांच्या समस्यांवर आवाज उठवला. स्वातंत्र्योत्तर भारताच्या विकास प्रक्रियेमध्ये शेतकरी आणि शेतमजुरांना स्थान मिळावे म्हणून आयुष्य वेचणारे, कृषी मालाला योग्य हमी भाव मिळावा, यासाठी देशव्यापी आंदोलन छेडणारे, पोशिंद्या शेतकऱ्यांना आर्थिक स्वातंत्र्याचा मूलमंत्र देणारे शेतकरी संघटनेचे लढवय्ये नेते आणि संस्थापक अध्यक्ष म्हणून शरद जोशी ओळखले जातात.

**बीजशब्द :** शेतकरी संघटना, चळवळी, शरद जोशी, कृषीमाल, कर्ज, आंदोलने

## विषय विवेचन :

शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात जगतो आणि कर्जातच मरतो, ही वस्तुस्थिती बदलण्यासाठी शेतीचे खरे अर्थशास्त्र शरद जोशींनी समजावून सांगितले. शेतमालाला रास्त व उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाल्याशिवाय शेती फायद्याची होणार नाही, असे ते नेहमी म्हणत. त्यासाठीच त्यांनी आयुष्यभर लढा पुकारला होता. शेतकऱ्यांना रास्त भाव मिळाल्याशिवाय ते बचत करू शकरणार नाहीत, गुंतवणूक करू शकणार नाहीत, कर्ज फेडू शकणार नाहीत. हे झाल्याशिवाय शेतकऱ्यांची क्रयशक्ती वाढणार नाही, हे अर्थशास्त्र ते सोप्या भाषेत सांगायचे. त्यांनी शेतकऱ्यांना लढायचे बळ दिले आणि एक संपूर्ण पिढी शरद जोशींच्या मागे राहिली. या विविध पैलूंचा अभ्यास पुढील मुद्यांतर्गत केलेला आहे.

## 'इंडिया विरुद्ध भारत' संकल्पनेचे प्रणेते :

शेतकऱ्यांशी समरस होण्यासाठी शरद जोशींनी पुणे जिल्ह्यातील आंबेठाण येथे जमीन घेऊन शेती करण्यास सुरुवात केली. त्यांनी 1979 मध्ये शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढण्यास सुरुवात केली. त्यातूनच 'शेतकरी संघटने'ची स्थापना केली. 'शेतमालास रास्त भाव' हा एककलमी कार्यक्रम घेऊन त्यांनी चाकण येथे सर्वप्रथम कांदा उत्पादकांचे आंदोलन उभारले. नंतर कांद्यासह, ऊस, तंबाखू, दूध, भात, कापूस इत्यादी पिकांसाठी त्यांनी राज्यभरात विविध ठिकाणी आंदोलने केली. त्यासाठी उपोषणे, मेळावे, तुरुंगवास, शिबिरे या मार्गांनी त्यांनी अनेक मागण्या मान्य करून घेतल्या. शेती आणि शेतकरी यांचा अभ्यास असणारे अनेक नेते त्यांनी घडवले. शेतकऱ्यांच्या दुरवस्थेचे वर्णन करणारी 'इंडिया विरुद्ध भारत' ही संकल्पना क्रांतिकारी ठरली. विकसित देशांत शेतकऱ्यांना उणे सबसिडी दिली जाते हे त्यांनी भारतीय व्यवस्थेला दाखवून दिले. 'ज्या देशात पालक आपल्या शाळेतल्या मुलांना शंभराची नोट पॉकेटमनी म्हणून देतात तो इंडिया आणि चवली हरवली तर अंधारातही म्हातारी शोधत राहते तो भारत!'[1] असे ते म्हणत.

## आदेश आदेश आदेश :

शेतकरी संघटनेची चळवळ नाशिक जिल्ह्यात फोफावली होती. कोणतीही जाहिरात नाही, प्रचार नाही अशा स्थितीत कुठेतरी एक किंवा दोन बोर्ड लागायचे. तेवढ्या बोर्डवरच लाखो शेतकरी सभेसाठी जमायचे.

राज्य सरकारने कांद्याची हमी भावाने खरेदी करावी यासाठी त्यांनी आंदोलन उभे केले. परंतु नेमके त्याच वेळी पावसाळी वातावरण निर्माण झाले कांदा भिजला तर नुकसान होईल, त्यामुळे आंदोलन संपवून यार्डावर कांदा न्या आणि मिळेल त्या भावात विकून घरी जा, नाहीतर देशोधडीला लागाल, असा प्रचार कांद्याच्या व्यापाऱ्यांनी व दलालांनी सुरू केला. त्यामुळे शेतकरी चलबिचल झाले, हतबल झाले. यार्डावर कांदा मागच्या बाजूने जायला लागला, हे कळताच शरद जोशींनी त्यांना थोपविण्यासाठी धाव घ्यावी, असे ठरले; पण मग आंदोलनाचे नेतृत्व कोण करणार? असा प्रश्न निर्माण झाला असता शरद

जोशींच्या सौभाग्यवती त्यांची जागा घेण्यास तयार झाल्या व त्यांनी या आंदोलनाची धुरा काही काळ सांभाळली. जोशींनी त्या शेतकऱ्यांना थोपविले व तो लढा यशस्वी केला.

'मी तुमच्या दाराशी कधी मते मागायला आलो तर मला जोड्याने मारा, माझी गाढवावरून धिंड काढा'[2], असे ते सुरुवातीच्या सभांमध्ये सांगायचे; मात्र 'राजकीय पक्ष काढणे ही माझी हताशता आहे', असेही त्यांनी पुढल्या सभांमध्ये सांगितले होते. 'एवढ्या प्रचंड जनशक्तीला संघटित केले की, कोणत्याही पक्षाचे असो, ते सरकार झुकेल, शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेईल, अशी माझी आशा होती; परंतु ती फोल ठरली. त्यामुळे नाइलाजाने मला राजकीय पक्ष काढण्याची भूमिका घ्यावी लागली' असे त्यांना सांगावे लागले. मात्र भारतीय अर्थकारण, कृषी क्षेत्र, कृषी पतपुरवठा या सगळ्याचे चित्र एकहाती बदलवून टाकण्याचा चमत्कार घडविणारा हा नेता होता.

उत्पादन खर्चावर आधारित भाव, त्यात शेतकऱ्याचे, त्याच्या मजुरांचे आणि शेतीसाठी वापरलेल्या प्राण्यांच्या कष्टाचेही दाम समाविष्ट असले पाहिजे, शेतकऱ्याची पत्नी, मुले त्या शेतीत राबत असतील तर त्यांच्याही कष्टाचे दाम त्यात अंतर्भुत असले पाहिजे, अशी नवी मांडणी त्यांनी केली. उद्योगधंदे जर संकटात सापडले तर त्यांना दिलेल्या कर्जाची त्याच्या परतफेडीची जशी पुनर्रचना केली जाते, सवलती दिल्या जातात, त्याच पद्धतीने शेतीला दिलेल्या कर्जाचीही परिस्थितीनुसार फेररचना व्हावी, ही मागणी त्यांनी पूर्ण करून घेतली. कोणतीही सवलत अथवा कर्जमाफी किंवा व्याजमाफी शेतकऱ्यांना देऊ नका, त्यांना फक्त त्यांच्या घामाचे रास्त दाम द्या, अशी मागणी करणारा हा क्रांतिकारी नेता होता. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात 80 टक्के मंत्री शेतकऱ्यांची मुले, भारताच्या मंत्रिमंडळात तेवढेच मंत्री शेतकऱ्यांच्या कुटुंबातून आलेले. शेती हा राष्ट्रीय व्यवसाय. रोजगार आणि अर्थव्यवस्थेचा कणा; तरीही शेतकरी उपेक्षित का? या त्यांच्या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेही नव्हते आणि म्हणूनही त्यांचे आंदोलन यशस्वी झाले.

## डंकेल कराराचे स्वागत :

1990 नंतर जागतिक बँकेच्या दबावामुळे देशाची अर्थव्यवस्था खुली करण्याचा निर्णय घ्यावा लागला. तत्कालीन पंतप्रधान श्री. नरसिंहराव आणि तत्कालीन अर्थमंत्री श्री. मनमोहन सिंग यांनी हे निर्णय घेतले. त्याच वेळी गॅट कराराचा मसुदा 'डंकेल ड्राफ्ट' म्हणून गाजू लागला. देशभर डंकेल कराराच्या विरोधात सर्व विचारवंतांनी कल्लोळ माजवला. जागतिकीकरण, उदारीकरण, खासगीकरण या सर्वांना खलनायक केले गेले होते. पेटंट कायदे व जी.एम. तंत्रज्ञानाला विरोध होऊ लागला. डंकेल कराराच्या विरोधी चळवळीमागे देशी औषध उत्पादकांच्या लॉबीचे उघड अर्थसहाय्य होते. पेटंट कायद्याची शेतकऱ्यांना भीती दाखवून या सर्वांविरोधात शेतकऱ्यांना उभे करण्याचा प्रयत्न केला गेला. डंकेल करार झाला तर शेतकऱ्यांचे पीक आणि गाईचे वासरूसुद्धा त्याच्या मालकीचे असणार नाही, असा प्रचार झाला. या सर्वांविरोधात जाऊन शरद जोशींनी डंकेल कराराचे स्वागत केले. खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. कारण त्यांनी भविष्याचा वेध घेतला होता व त्यांचा निर्णय कालांतराने योग्य ठरला.

## योद्धा :

शरद जोशींना आणि त्यांच्या संघटनेला माध्यमांचे जबरदस्त आणि अभूतपूर्व पाठबळ लाभले होते. माध्यमांच्या दृष्टीने शेतकरी एकत्र येतात, आपली संघटना उभारतात, आवाज बुलंद करतात आणि सरकारला दाती तृण धरून आपल्या मागे धावायला भाग पाडतात, हे सारेच अभूतपूर्व आणि न भूतो होते. त्यामुळे सारी माध्यमे अक्षरशः वेडावल्यासारखी झाली होती. हे वेडावलेपण किती तर जोशींचे नाशिक जिल्ह्यातील कांदा आंदोलन सुरू असतानाच्या काळात दुसऱ्या दिवशी होणाऱ्या सभेला जमणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या किती लाख छापायची, हे आदल्या रात्रीच सारी प्रसार माध्यमे एकत्र बसून ठरवीत असत. मग प्रत्यक्षात सभेला येणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या काही हजारात का असेना! आदेश आदेश आणि आदेश हा त्या काळातील जणू नवाक्षरी मंत्र आणि 'भीक नको, पण घामाचा दाम' हा उद्‌घोष बनला होता.

पुणे जिल्ह्यातील चाकण ही जरी संघटनेची जन्मभूमी असली तरी तिची कर्मभूमी म्हणजे नाशिक जिल्हा. त्यामागील महत्त्वाचे कारण म्हणजे कोणत्याही संघटनेला जे निष्ठावान मनुष्यबळ लागते त्याचा पुरवठा करणारे तीन बलदंड नेते नाशिक जिल्ह्यातूनच शरद जोशींच्या पाठीशी उभे राहिले. त्या काळात महाराष्ट्रातील मोजक्या मजबूत अशा साखर कारखान्यांमध्ये ज्याची गणना होई, त्या निफाड कारखान्याचे

तत्कालीन अध्यक्ष माधवराव बोरस्ते, याच कारखान्याचे एक संचालक प्रल्हाद पाटील कराड आणि जिल्ह्यातील एक प्रगतीशील द्राक्ष बागायतदार माधवराव खंडेराव मोरे ही त्रयी शरद जोशींच्या मागे उभी राहिली. तिघेही जिल्ह्यातील वजनदार आणि बोलके नेते.

बोरस्ते—मोरे मराठा समाजातले तर कराड वंजारी समाजातले. त्यामुळे जातीय समीकरणही जुळून आले. पण तरीही त्या काळात चर्चिली जाणारी सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे वसंतदादा पाटील यांचा संघटनेला असलेला आशीर्वाद किंवा त्यांचे छुपे समर्थन. राज्यातील बव्हंशी शेतकरी समाज मराठा समाजातला. त्यामुळे या समाजाने एका 'जोशी'च्या हाकेला ओ देणे योग्य नाही, असा प्रचार एकीकडे होत होता तर शरद जोशी फत बड्या शेतकऱ्यांचे हितकर्ते आहेत असादेखील जोरदार प्रचार होत होता. पण गळ्यात संघटनेचं डोरलं बांधलेल्या लोकांचं पातिव्रत्य जराही कुठे भंगलं नाही. सरकार हीच शेतकऱ्यांची फार मोठी समस्या आहे, ही भूमिका लोकांना भावत होती.

1984 ची लोकसभा निवडणूक श्रीमती इंदिरा गांधींच्या हत्येने वेगळ्या वातावरणात झाली. राजीव गांधींनी देशभरातून अनेक तरुण उमेदवार दिले. त्यात नाशिकमधून मुरलीधर माने यांचा समावेश होता. त्यांच्या विरोधात प्रल्हाद पाटील उभे राहिले. शरद जोशींनी काँग्रेसच्या विरोधात भले काही जाहीर सभा घेतल्या; पण कराडांना मतदान करा असा आदेश दिला नाही. बहुधा तोवर तरी राजकारणाच्या जोड्याचा विटाळ त्यांच्या मनात कायम होता. त्यांच्या आदेश न देण्याने कराड पराभूत झाले. संघटनेपासून हळूहळू दुरावत गेले.

त्यानंतरच्या काळात जोशींची वैचारिक घसरण वेगाने होत गेली. वेगवेगळ्या शेती उत्पादनांच्या प्रश्नासाठी कधी शेतकरी महिला मेळावे घे, रास्ता रोको कर, रेल्वे बंद पाड, डोंगर चढउतार कर हे सारे सुरूच होते. पण सरकार हीच शेतकऱ्यांसमोरील सर्वात मोठी समस्या आहे असे सांगणारे जोशी सरकारच्या आणि सत्तेच्या समीप घेऊन जाणारी पावले टाकू लागले. 'स्वतंत्र भारत' नावाचा पक्ष त्यांनी काढला.

## बळीराजाच्या पत्नीला 7/12 वर स्थान मिळवून देणारा द्रष्टा :

राज्यातील शेतकऱ्यांच्या पत्नीला त्यांच्याकडे असलेल्या संपत्तीतील वाटा मिळवून देण्याचे संपूर्ण श्रेय शरद जोशी यांना आहे. पतीच्या निधनानंतरही त्या शेतकरी महिलेला सन्मानाने जगता यावे याकरिता शरद जोशी योनी 'लक्ष्मीमुक्ती' कार्यक्रम ही मोठी चळवळ उभारली होती. शेतकऱ्यांनी आपल्या पत्नीच्या नावे जमिनीची मालकी करून देण्याची ही चळवळ तेव्हा सुरू झाली, नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे 1986 मध्ये शेतकरी संघटनेची जाहीर सभा झाली. त्यातच पत्नीच्या नावावर शेतकऱ्यांनी जमिनी करून द्यायच्या, असा ठराव पारित करण्यात आला. दारूबंदीचा ठरावही याच बैठकीत झाला. पुढे 2 लाख शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनी पत्नीच्या नावे केल्या होत्या. रोज हजारो शेतकरी शेती पत्नीच्या नावे करण्यासाठी तहसील कार्यालयात अर्ज द्यायचे. या चळवळीला लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. या चळवळीची दखल तत्कालीन मुख्यमंत्री ना. सुधाकरराव नाईक यांनी घेतली. लक्ष्मीमुक्ती या नावाने शासकीय अधिनियमच त्यांनी काढला. पत्नीच्या नावे जमीन करून देणाऱ्या शेतकऱ्यांनी या परिपत्रकाच्या आधारे तहसीलमध्ये अर्ज करण्याचे आवाहनही नाईक यांनी केले होते. महिलांना त्यांच्या सासरच्या संपत्तीत वाटा मिळाला हे या आंदोलनाचे फलित होते. पुढे जळगाव जिल्ह्यातील रावेर येथे एक कार्यक्रम घेऊन या सर्व शेतकऱ्यांचा जाहीर सत्कार शरद जोशी यांनी केला होता.

1991 च्या 5 जानेवारीला वाघोलीत शरद जोशी रात्री साडेअकरा वाजता आले. त्यांच्या आंदोलनामुळे प्रभावित झालेले आणि त्यांच्या आंदोलनामुळे न्याय मिळतो अशी भावना ग्रामस्थांत असल्याने आबालवृद्धांसह महिलाही जाग्या होत्या. या वेळी घड्याळाचा काटा बाराकडे सरकत असताना 145 महिलांना त्यांच्या नावाने झालेल्या शेताच्या सातबाऱ्याचे जोशी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. ही होती 'लक्ष्मीमुक्ती' आंदोलनाची फलनिष्पत्ती.

## भीक नको हवे घामाचे दाम! :

स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे रणशिंग महाराष्ट्रातूनच फुंकले गेले होते. स्वातंत्र्यानंतर प्रामुख्याने कामगारांचे लढे या देशाने अनुभवले, त्यावर डाव्यांचे वर्चस्व होते. पण त्यांनी एकही लढा शेतकऱ्यांसाठी उभारला नाही. शेतकऱ्यांकरिता महात्मा ज्योतिबा फुल्यांनी, सरदार वल्लभभाई पटेलांनी आणि त्यानंतर

महात्मा गांधींनी स्वातंत्र्यापूर्वी कार्य केले होते. पण स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्यांची खऱ्या अर्थाने सामाजिक आणि आर्थिक बाजू भक्कमपणे पहिल्यांदा अगदी पुराव्यांसह कुणी मांडली असेल तर ती शरद जोशी यांनी. 'भीक नको हवे घामाचे दाम!' अशी गर्जना त्यांनी केली आणि लक्षावधी शेतकरी त्यांच्या आंदोलनात सामील झाले. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा म्हणून मुक्त अर्थव्यवस्थेचे आणि डंकेल प्रस्तावाचेही त्यांनी समर्थन केले होते. शेती हा एक उद्योग आहे हे ते तात्त्विक पद्धतीने पटवून देत.

शरद जोशींच्या शेती तत्त्वज्ञानाची दखल देशाला घ्यावी लागली. शेतीचा स्वतः प्रयोग करताना उत्पादन खर्चही निघत नाही, ही वस्तुस्थिती त्यांनी अनुभवली. बारीकसारीक गोष्टींसाठीही किती पैसे खर्च करावे लागतात, याचे गणित त्यांनी मांडले. शेती उत्पादनाचे मूल्य सरकार ठरवीत असे. जोशी यांनी त्या धोरणाला तीव्र विरोध केला. मालाचे दर ठरविण्याचे अधिकार हे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याला असायला हवे, ही मागणी जोशींनीच प्रथमतः केली. शेतकरी, शेतमजूर, आणि शेतकऱ्याचे कुटुंब यांना आपल्या आंदोलनाशी जोडून संपूर्ण शेतीव्यवसाय कसा विकास पावू शकतो, याचे प्रात्यक्षिक त्यांनी सरकारला आणि जगाला दाखवून दिले. सत्ताधाऱ्यांच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे व्यथित झालेल्या जोशींनी उभारलेल्या या लढ्याला मिळालेला शेतकऱ्यांचा, ग्रामीणांचा, महिलांचा प्रतिसाद अचंबित करणारा होता.

1987 साली संघटनेचा शेतकरी–शेतमजूर महामेळावा नागपूरच्या कस्तुरचंद पार्कवर झाला. या कार्यक्रमाला अटलबिहारी वाजपेयी, विश्वनाथ प्रताप सिंह, चंद्रशेखर यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांसह 13 राज्यांतील शेतकरी नेते उपस्थित होते. नागपूरचा संपूर्ण कस्तुरचंद पार्क इतिहासात पहिल्यांदाच शेतकऱ्यांच्या गर्दीने भरून गेला होता. तशी गर्दी नंतरही कधी झाली नाही. ही किमया शरद जोशींची होती. वर्ध्याच्या सरोजताई काशीकर, चंद्रपूरचे वामनराव चटप आणि कृषी विषयाचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तज्ञ विजय जावंधिया यांच्यासारखी दिग्गज मंडळी त्यांच्यासोबत जुळली. त्यांच्या मोर्चांमधील शेतकऱ्यांची प्रचंड संख्या पाहून सरकार त्यांच्याशी रस्त्यातच चर्चा करायला जात असे. यावरून शरद जोशींचा प्रभाव लक्षात येतो.

'कापसासह विविध कृषीमालाची भाव ठरविण्याची पद्धत सदोष असून ती बदलणे आज गरजेचे आहे. कृषी उत्पादनांना मिळणाऱ्या भावात सत्तर टक्के शेतकऱ्यांचा काहीच फायदा होत नाही. सध्याची कृषीमालाची हमी भाव ठरविण्याची पद्धत कालबाह्य झाली आहे. विदर्भातील कापूस उत्पादकांना उत्पादनखर्च भरपूर असून अल्प भाव मिळतो.'[3] याची जाणीव त्यांना होती. कांदा, कापूस, तंबाखू, ऊस अशा अनेक पिकांना योग्य दर मिळावा, उत्पादनखर्चात आणखी 50 टक्के रक्कम मिळून दर मिळावा, ही मागणी पहिल्यांदा शरद जोशींनी केली होती. त्यांच्या या लढ्याात शेतकऱ्यांवर लाठीमार झाला, अश्रुधुराच्या नळकांड्याा फोडल्या गेल्या, गोळीबार झाला. या सर्वांत शंभरावर शेतकरी शहीदही झाले. पण आंदोलनांचा प्रभाव ओसरला नाही. घामाच्या दामाच्या मागणीसाठी हे लढे सुरूच राहिले.

## झंझावात :

शरद जोशी म्हणजे एक झंझावात होते. भल्या मोठ्या पगाराची संयुक्त राष्ट्र संघटनेतील नोकरी सोडून पुण्याजवळील आंबेठाण या आपल्या खेड्यात काही काळ कोरडवाहू शेतीचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन त्यांनी शेतकऱ्यांसाठी चळवळ उभी केली होती. या क्षेत्रातील त्यांच्या ज्ञानाधिकाराविषयीचा दरारा सरकार दरबाराइतकाच लोकमानसातही होता. शेतकऱ्यांना समजणाऱ्या सोप्या भाषेत जगाचे अर्थकारण व त्यातील कृषिक्षेत्राचे योगदान समजावून सांगणाऱ्या जोशींच्या मागे अल्पावधीच शेतकरी आणि संपूर्ण ग्रामीण भाग उभा राहिला. पाच–पाच लाखांच्या शेतकऱ्यांच्या किंवा शेतकरी स्त्रियांच्या सभा त्यांच्या अगोदर व त्यांच्या नंतरही महाराष्ट्रात घेणे दुसऱ्या कोणत्याही नेत्याला कधी जमले नाही. आपली शिदोरी सोबत घेऊन सभांना येणारा हा वर्ग त्यांनी सांगितलेल्या अर्थकारणावर मंत्रमुग्ध झाला होता. सरुवातीला कांदा, नंतर ऊस, त्यानंतर धानासाठी मोठमोठाली आंदोलने उभी करणाऱ्या आणि संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढणाऱ्या या नेत्याचा झंझावात दीपवून टाकणारा होता.

1920 च्या दशकात सरदार पटेलांनी गुजरातमध्ये उभारलेल्या शेतकऱ्यांच्या लढ्यानंतर देशात झालेला दुसरा व एकमेव शेतकरी लढा शरद जोशी यांचाच होता. शेतकरी वर्ग एकत्र किंवा संघटित होऊ शकत नाही, हा राज्यकर्त्यांचा भ्रम दूर झाला. भारतातल्याच नव्हे तर जगातल्या कृषितज्ञांनी व

अर्थतज्ज्ञांनी जोशींच्या नेतृत्वात अभिनव घडणाऱ्या या घटनांची दखल घेत वृत्तपत्रे, नियतकालिके आणि ग्रंथांमधून हा लढा शब्दांत मांडला.

शरद जोशी यांची मांडणी तर्कशुद्ध असायची. भाषा अत्यंत साधी, तशीच राहणीही. जगातल्या कृषिशास्त्राचे युनोत मिळवलेले ज्ञान त्यांच्या पाठीशी होते. म. गांधींनंतर शेतकरी व ग्रामीण जीवनात नवी आशा जागवणारा नेता म्हणून त्यांच्याकडे बघितले गेले. पण जेव्हा त्यांनी राजकारणाच्या माध्यमातून हा लढा पुढे नेण्यासाठी स्वतंत्र भारत पक्ष स्थपन केला तेव्हा हा नेता या ग्रामीण जनतेला, शेतकऱ्यांना नकोसा झाला. जातिधर्मात विभागलेले आपले राजकारण आणि संघटित व राजकारणनिरपेक्ष कृषिकारण यांचा मेळ त्यांना साधता आला नाही. परिणामी संघटना विस्कळीत झाली आणि ग्रामीण जनतेच्या भाग्योदयाचा आशावादही संपुष्टात आला. त्यांच्या पक्षाला विधानसभेत एका जागेखेरीज अन्य कुठेही यश मिळाले नाही.

नंतर शरद जोशी यांनी कृषिकारणावर अत्यंत अभ्यासपूर्ण अशी पुस्तके लिहिली. सरकारला सल्ला देण्याचे कामही त्यांनी केले. मात्र या सल्ल्यामागे पूर्वीची ग्रामीण ताकद त्यांना उभी करता आली नाही. सल्ला सरकारने गांभीर्याने घेतला नाही. हा त्यांचा अपयशाचा काळ होता; तरीही त्यांनी आपल्या शास्त्रीय व अभ्यासू भूमिकेशी प्रतारणा केली नाही. ज्या वेळी देशातले बहुतेक पक्ष जागतिकीकरणाला, खुल्या व स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेला विरोध करत होते, शरद जोशी मात्र जागतिकीकरण व खुली अर्थव्यवस्था शेतकऱ्यांच्या व देशाच्या हिताची आहे, असे सांगत होते. समाजवादापायी देश आणि शेतकरी गरीब राहिल्याचे स्पष्टपणे सांगण्याचे धारिष्ट्य त्यांनी केले. त्यांची ही भूमिका आज उजव्या पक्षांएवढीच डाव्यांनीही स्वीकारली आहे.

राजकारणातील व्यक्ती झटपट श्रीमंत होतात, जोशी मात्र त्याला अपवाद होते. तब्येतीची कारणे व अर्थकारणातली दगदग यावर उपाय म्हणून ते शिवसेनेच्या मदतीने राज्यसभेवर नाइलाजाने गेले. मात्र सेनेच्या भूमिका त्यांनी स्वीकारल्या नाहीत. शेतकरी आणि ग्रामीणांच्या हितासाठीच शेवटपर्यंत एकाकी लढत राहणारा हा झुंझार नेता होता.

## भौतिकवादी चळवळीचा आध्यात्मिक अधिष्ठाता :

शेतकऱ्यांची चळवळ ही स्वातंत्र्य चळवळीप्रमाणेच आहे, असे जोशी म्हणत. व्यष्टीप्रमाणेच समष्टीच्या स्वातंत्र्याची जपणूकही त्यांना अगत्याची वाटत होती. व्यक्ती किंवा आत्मस्वातंत्र्य मिळविण्याचे मार्ग शोधण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्याचाच एक भाग म्हणून हा झुंझार लोकनेता आयुष्याच्या एका वळणावर नर्मदा परिक्रमेला निघाला. दुर्दैवाने हृदयाच्या त्रासाने त्यांना हा प्रवास सोडून अर्ध्यातूनच परतावे लागले. अडचणींवर मात करणे हा स्वभाव असल्याने प्रकृती ठीक होताच त्यांनी ही राहिलेली परिक्रमा पूर्ण केली. तत्पूर्वी पूर्वतयारी म्हणून त्यांनी विपश्यनेचे एक शिबिर केले होते.

शेतकरी चळवळीचा जोर ओसरत असताना या चळवळीला व्यक्तिस्वातंत्र्यवादी तत्त्वज्ञानाचा गाभा आहे; पण तो नेमक्या कशा पद्धतीने मांडला गेला पाहिजे, याविषयी त्यांच्या मनात काही संभ्रम असल्याचे जोशी म्हणाले होते. ते बद्धिप्रामाण्यवादी होते. तर्कसुसंगत विचार त्यांच्याजवळ होता. शेतकऱ्यांविषयी जिव्हाळा होता. 'माझी चळवळ भौतिकवादी आहे, मी मालाला भाव हवा म्हणून लढतो आहे, शेतकऱ्यांची गरिबी दूर व्हावी, शेतकऱ्यांचे स्वातंत्र्य मला हवे आहे' असे ते म्हणत. बहुधा या भूमिकेचे आध्यात्मिक अधिष्ठान, विचारांचा पाया त्यांना पक्का करायचा असावा. लक्षावधी शेतकऱ्यांना एका हाकेसरशी एकत्र जमविणारे शरद जोशी वैयक्तिक आयुष्यात या चळवळीला आध्यात्मिक अधिष्ठान कसे देता येईल या विचारांत गुंतले होते. आपल्या विचारांना तर्कसंगती असली पाहिजे, हा तर त्यांचा ध्यासच होता. त्यासाठी शरद जोशींनी आयुष्याच्या उत्तरार्धात आध्यात्मिक उपासनेच्या काही वाटांचा मागोवा घेतला होता.

## चळवळीसंदर्भातील विपुल लेखन :

शरद जोशी यांनी आपली भूमिका समाजापर्यंत पोचविण्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीमध्ये अनेक पुस्तके, लेखमाला, वृत्तपत्रीय सदर यांचे लेखन केले. शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती, चांदवडची शिदोरी : स्त्रियांचे प्रश्न, शेतकऱ्यांचा राजा शिवाजी आणि इतर लेख, स्वातंत्र्य का नासले?, खुल्या व्यवस्थेकडे : खुल्या मनाने, अंगारमळा, जग बदलणारी पुस्तके, अन्वयार्थ 1, 2, माझ्या शेतकरी भावांनो आणि मायबहिणींनो, बळीचे राज्य येणार आहे, अर्थ तो सांगतो पुन्हा, पोशिंद्याची लोकशाही,

भारतासाठी, राष्ट्रीय कृषिनीती, समस्याए भारतकी, स्वतंत्रता क्यों नाकाम हो गई? भारत आय व्ह्यू, भारत स्पिक्स आऊट, डाऊन टू अर्थ दि वूमन्स क्वेशन, ॲन्सरिंग बिफोर गॉड ही त्यांची पुस्तके आहेत.

## समारोप :

आज शेतकऱ्यांची अवस्था बिकट आहे. प्रचंड प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरू आहे आणि कमी न होता ते वाढतच आहे. शेतमालाला भाव मिळत नाही. उत्पादन खर्चही निघेनासा झाला आहे. मजुरी देणंही परवडत नाही. निसर्गाचा समतोल बिघडलेला आहे. पाऊस पुरेसा पडत नाही. एवढी मोठी प्रदीर्घ काळ मेहनत घेऊन, कष्टातून शेती उत्पादन केले तर नेमके त्याच वेळी व्यापारी भाव पाडतात. शासन कर्ज द्यायला पुढे येते; पण ते फेडण्यासाठी जी उपाययोजना व्हावयास हवी ती होत नाही. सिंचनाचे अनुशेष वाढतच आहेत. शेती व शेतकऱ्यांकरिता दिलेले पॅकेजेस मध्यस्थ फस्त करतात. योजना कागदावरच तयार होतात. त्या प्रभावीपणे राबविण्याची यंत्रणा शासनाजवळ नाही. मध्यल्या मध्ये मढ्याच्या टाळूवरचं लोणी खाणाऱ्यांना कठोर शिक्षा होत नाहीत. कितीतरी दशकांपासून दिले जाणारे हमी भाव आजही फारसे वाढलेले नाही; याउलट वेतन घेणाऱ्या सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील वेतनात प्रचंड वाढ झालेली आहे. नोकरशहा वर्ग श्रीमंत होत आहे, व्यापारी श्रीमंत होत आहेत; पण शेतकरी होता त्यापेक्षाही अधिक गरीब होत चालला आहे. शेतकऱ्यांवर व्यसनांचा आरोप लावणारी सरकारी यंत्रणा त्यांच्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात व्यसनांच्या आहारी गेली आहे. लग्नासारख्या समारंभांवर शेतकरी अधिक खर्च करतात, हा आरोप लावणाऱ्यांनी एकदा राजकीय पुढाऱ्यांची प्रत्येक कार्यक्रमातील उधळपट्टी बघावी.

कोणी काहीही म्हणोत, शेतकऱ्यांना आजही वाली नाही. शेतकऱ्यांचे प्रश्न चिघळत ठेवण्यात शासनाचे भले आहे, हीच विचारधारा कायम आहे. प्रचंड पॅकेजेस मधून मिळणारा पैसा हा लालफितशाहीसाठी सोन्याचे अंडे देणाऱ्या कोंबडीप्रमाणे आहे. या आत्महत्या आताच्या घडीला थांबण्याची शक्यता कमीच वाटते. एकदा हाताबाहेर गेलेली परिस्थिती परत रुळावर आणायला आणखी दीर्घकाळ लागेल. शेतकरी व्यापारी झाले पाहिजेत. स्वतः माल विकण्याचे स्वातंत्र्य त्यांना हवे. मालाचे भाव त्यांनीच ठरवावे. थेट ग्राहकांपर्यंत त्यांना पोचण्याची यंत्रणा हवी. याचा फायदा शेतकरी आणि सामान्य ग्राहक दोघांनाही होईल.

शेतकऱ्यांकरिता असलेल्या योजना त्यांच्यापर्यंत पोचविण्यात हलगर्जी करणाऱ्यांना आणि मधल्यामध्ये डाव साधणाऱ्यांना कठोर शिक्षा झाल्या पाहिजेत. दर वर्षी नित्यनेमाने वेतनधारकांचा महागाई भत्ता वाढविणाऱ्या शासनाने त्याच दराने शेतमालाचा हमी भाव वाढवण्याची गरज आहे. सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी 'फास्ट ट्रॅक कोर्टा'च्या धर्तीवर भ्रष्टाचार मुक्त फास्ट ट्रॅक ॲक्शन प्लॅन तयार करणे गरजेचे आहे. 12 ते 18 तास जे वीजेचे भारनियमन ग्रामीण भागात केले जाते, ते तात्काळ थांबवून शेतकऱ्यांना 24 तास विजेची उपलब्धता दिली पाहिजे. सौर ऊर्जेवरील पंप त्यांना पुरविले पाहिजेत. नवनवीन तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत पोचले पाहिजे, त्यांना पटवून देता आले पाहिजे. त्यांना लुटणाऱ्या खाजगी सावकारांना हद्दपार केले पाहिजे. गाड्याा घेणाऱ्यांना किंवा बंगले उभारणाऱ्यांना कर्ज देण्यापेक्षा बँकांनी अधिकाधिक आर्थिक सहकार्य शेतीसाठी दिले पाहिजे. पण हे सर्व कधी होणार आणि कोण करणार?

शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न गेल्या काही वर्षांपासून अधिक भेडसावत आहे. शरद जोशी सक्रिय होते, तेव्हा शेतकरी कष्टकऱ्यांना आधार वाटत होता. कोणत्याही शासनाला शेतकऱ्यांचे प्रश्न आणि आत्महत्यांचा केवळ राजकीय दृष्टीने फायदा घ्यायचा असतो, हे आता लपून राहिलेले नाही.

निसर्ग साथ देत नाही, सतत दुष्काळी परिस्थिती, लालफितशाहीचे कागदी घोडे आणि अपुरी मदत व दिशाहीन झालेल्या शेतकऱ्यांना नाइलाजास्तव शेतीव्यवसायापासून दूर जावे लागत आहे.

शरद जोशींच्या निघून जाण्याने शेतकऱ्यांचीच नव्हे तर समग्र देशाची मोठी हानी झाली आहे. दोन वेळच्या पोटाच्या भाकरीसाठी जगणाऱ्या प्रत्येक मनुष्याने एवढा तरी विचार करावा की आपल्या पोटासाठी हे दोन घास देणाऱ्या शेतकऱ्याकरिता आपण काय करतो? पुन्हा एखादा प्रचंड ताकदीचा शरद जोशी तयार होईल काय? आणि झाला तर ही व्यवस्था त्याला शेतकऱ्यांसाठी कार्य करू देईल काय, ह्या प्रश्नाचे उत्तर आज तरी नकारार्थीच द्यावे लागेल.

## संदर्भ :

1. मांडवकर, पवन, **शरद जोशी**, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र, कळंब, प्रथमावृत्ती, 2016, पृ. 7
2. मांडवकर, पवन, **शरद जोशी**, **उनि.**पृ. 11
3. मांडवकर, पवन, **शेतकऱ्यांच्या आत्महत्या**, सेवा प्रकाशन, अमरावती, प्रथमावृत्ती, 2006, पृ. 24

## संदर्भ ग्रंथ :

1. देशमुख, बी.टी., महाराष्ट्रातील जल सिंचन अनुशेष क्ष किरण परीक्षा, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 1998.
2. लांजेवार, नरेंद्र, शेतकऱ्यांच्या आत्महत्या : चिंतन आणि उपाय, सुमेरू प्रकाशन डोंबिवली, प्रथमावृत्ती.

❖❖❖